# ‘म्हातारपणाची काठी’ म्हणून ‘एनपीएस’चा आधार सर्वांसाठी!

दै. सकाळ - ६-११-२०१४



रमेश जाधव

भारतासारख्या विकसनशील देशात सामाजिक सुरक्षेचे कवच उपलब्ध नाही. अनेकांना निवृत्तीनंतरच्या जीवनशैलीची चिंता भेडसावताना दिसते. त्याचा परिणाम नागरिकांच्या वैयक्तिक, कौटुंबिक विकासावर होत आहे. वयाची साठी ओलांडल्यानंतरच्या काळासाठी उमेदीच्या वयातच निश्चित पेन्शनच्या काठीचे नियोजन केले नसेल तर त्या व्यक्तीस वृद्धापकाळात मोठी आर्थिक अडचण भासू शकते. शरीर आणि मन जेव्हा क्रियाशील असते, तेव्हा सर्वसाधारण व्यक्ती निवृत्तिवेतनाविषयी फारशी गंभीर नसते. परंतु, वाढती महागाई, बदलणारी कौटुंबिक संकल्पना, वाढणारे औषधोपचाराचे खर्च, तसेच बदलणाऱ्या जीवनशैलीसोबत वाढणारे आयुष्यमान या व इतर कारणांसाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या पेन्शनची व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे. निवृत्तीच्या काळात चांगल्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाचा पुरेपूर आनंद घ्यायचा असेल तर निवृत्तिवेतनाची पुरेशी व्यवस्था करणे आवश्यक ठरते.

भारतीय व्यवस्थेत ज्येष्ठांसाठी आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कोणतीही ठोस आणि भरीव अशी राष्ट्रीय योजना नसल्याने केंद्र सरकारने सप्टेंबर २०१३ मध्ये पेन्शन विधेयकाला कायदेशीर मान्यता दिली आणि निवृत्तिवेतन नियमितीकरण व विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून ‘राष्ट्रीय पेन्शन योजने’ला (एनपीएस) अधिक सुरक्षित व संरचनात्मक बनविले. परंतु, या अत्यंत पारदर्शक योजनेकडे गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आकृतिबंध प्रचार आणि प्रसार केला गेलेला नाही. नागरिकांमध्ये पुरेशी आर्थिक साक्षरता नसल्याने या योजनेविषयी सामान्य नागरिकांना फारशी माहिती नसल्याचे दिसून येते. योजनेचा योग्य प्रचार आणि प्रसार न होण्याचे मुख्य कारण म्हणजे ज्या संस्थांमार्फत ही योजना लोकांना उपलब्ध करू दिली गेली आहे, त्या वित्तीय संस्थांना या योजनेतून चांगला आर्थिक लाभ मिळत नाही. या योजनेच्या संदर्भात गुंतवणूक सल्लागार व संस्थादेखील प्रसार करताना दिसत नाहीत. ही योजना खूप क्लिष्ट आहे, पारदर्शक नाही, संपूर्ण निधी काढता येत नाही, कोणतीही कर्जसुविधा नाही, असे गैरसमज पसरविण्यात आले आहेत. परंतु, प्रत्यक्षात सर्वसामान्य नागरिकांपर्यंत ही योजना पोचवून त्यांना फायदा होणे अत्यंत गरजेचे आहे. निवृत्तिवेतन निधी तयार करण्यासाठी व निवृत्तिवेतन घेण्यासाठी नागरिकांना या योजनेत सरकारने खूप लवचिकता दिली आहे. त्यामुळे ही योजना लोकांपर्यंत पोचविण्यासाठी ग्रामीण व निमशहरी भागात आर्थिक जनजागृती निर्माण करणे गरजेचे आहे, जेणेकरून अधिकाधिक नागरिक या योजनेत सहभागी होतील.

कोणताही भारतीय नागरिक ज्याचे वय १८ ते ६० वर्षे आहे, तो या योजनेचे पेन्शन खाते काढून कायमस्वरूपी निवृत्तिवेतन क्रमांक (‘प्राण’) मिळवू शकतो. या योजनेत सर्व भारतीय नागरिक दोन प्रकारची खाती उघडू शकतात. ‘टियर-१’ या पहिल्या प्रकारचे खाते केवळ पेन्शनच्या उद्देशासाठी असून, यात नागरिकांना वार्षिक कमीत कमी ६ हजार रुपये किंवा दरमहा कमीत कमी ५०० रुपये भरणे अनिवार्य असते. या पेन्शन खात्यात नागरिकांना स्वतःचे पैसे वाढविण्याचे पर्याय निवडण्याचे पूर्णपणे स्वातंत्र्य दिले गेले आहे. यामध्ये हवा तो फंड मॅनेजर, तसेच गुंतवणुकीचा प्रकार निवडता येतो. तसेच या पेन्शन खात्यामधून एकूण २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा पेन्शन खातेधारकाचे वय ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पेन्शन मिळू शकते. आपल्या सोयीच्या हव्या त्या बँक खात्यात दरमहा पेन्शन जमा होऊ शकते. एसएमएस, ऑनलाइन आणि टोल फ्री क्रमांकाच्या साह्याने आपल्या खात्याचा अहवाल जाणून घेता येऊ शकतो.

दुसऱ्या प्रकारचे ‘टियर-२’ हे खाते केवळ गुंतवणूक व त्वरित परताव्यासाठी आहे. यासाठी ‘टियर-१’ खाते उघडणे बंधनकारक असते, ज्यात वार्षिक कमीत कमी २ हजार रुपये भरणे आवश्यक असते. यातील गुंतवणुकीवर कोणताही प्राप्तिकर सवलतीचा लाभ होत नाही, हे लक्षात ठेवावे. मात्र, भविष्यकालीन आर्थिक तरतूद म्हणून ‘एनपीएस’च्या रूपाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या या ‘म्हातारपणीच्या काठी’चा आधार सर्वांनी घेतला पाहिजे, हे नक्की!